# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०१/२०२५ (गुरूवार) दुपार**


---

## परमात्मा एक सेवक मानव धर्म बंदोबस्त पावनदौड येथे कार्यक्रम स्थळी पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांची भेट

दरवर्षी प्रमाणे पोस्टे मौदा अंतर्गत परमात्मा एक सेवक मानव धर्म आश्रम पावनदौडा या ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग ५३ लगत दिनांक २६/०१/२०२५ रोजी मानव धर्म सेवक मेळाव्याचे कार्यक्रमाचे आयोजन आहे. सदर ठिकाणी महारष्ट्र गोवा सह मध्यप्रदेश, छत्तीसगढ, गुजरात व इतर राज्यातुन ६ ते ७ लाख जनसमुदाय उपस्थित राहण्याची शक्यता आहे. सदर ठिकाणी आज दिनांक २३/०१/२०२५ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी भेट दिली. सदर ठिकाणी मा पोलीस अधिक्षक यांनी कार्यक्रम स्थळ, वाहन पार्कींग जागा आणि रस्त्याची पाहणी केली. पर्यायी रस्ते याबाबत सुध्दा सुचना देण्यात आल्या. सदर ठिकाणी श्री रमेश धुमाळ,अपर पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री संतोष गायकवाड उपविभागिय पोलीस अधिकारी कन्हान उपविभाग, पोलीस स्टेशन मौदा चे प्रभारी अधिकारी, जिल्हा विशेष शाखेचे प्रभारी अधिकारी , जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी अधिकारी , परमात्मा एक आश्रम यांची व्यवस्थापन टिम हजर होते. तसेच सदर ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण रस्ता बांधकाम व्यवस्थापक,सार्वजनिक बांधकाम विभागचे अधिकारी हे सुध्दा हजर होते. त्यांना सुध्दा रस्ते दुरूस्ती बाबत सुचना देण्यात आल्या आहे. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधिक्षक यांनी सर्वांना बंदोबस्त बाबत महत्त्वाच्या सुचना दिल्या. तसेच मा. पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनात ३– उपविभागिय पोलीस अधिकारी, ११ पोलीस निरीक्षक, ४१ सपोनि /पोउपनि , २९०– पोलीस अंमलदार ,१२० गृहरक्षक, आणि २ आर.सी.पी पथक असा बंदोबस्त लावण्यात आला आहे.

सदर कार्यक्रमात सेवकांना व सर्वसामान्य लोकांना जाणे– येण्यास वाहतुकीच्या दृष्टीने अडचण होवु नये, तसेच गर्दी मुळे एखादी अप्रिय घटना घडु नये म्हणून कार्यक्रम कालावधीत जड अवजड वाहनांना प्रवेश बंदी करणे करीता मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार यांच्या विनंती वरून पोलीस आयुक्त नागपूर शहर व जिल्हाधिकारी भंडारा यांनी अधिसूचना काढली आहे. नागपूर ते मौदा कडे जाणारी तसेच भंडारा ते नागपूर कडे येणारे सर्व प्रकारची जड अवजड वाहतुक वळविले असुन दिनांक २५/०१/२०२५ रोजी २४.०० वाजता दिनांक २६/०१/२०२५ ते २४.०० वाजता पर्यंत अंमलात राहील. याबाबत बदललेला मार्ग खालीलप्रमाणे –

१) नागपूर ते मौदा, भंडारा, तिरोडा, गोंदीया कडे जाणारी सर्व जड अवजड वाहतुक कापसी पुलीया येथुन मनसर –रामटेक–घोटीटोक–महादुला–सालई जाम कांद्री –खापा–मोहाडी–वरठी मार्गाने वळविण्यात येईल.

२) साकोली, लाखनी भंडारा येथुन भांडारा मौदा मार्ग नागपूरकडे येणारे जड अवजड वाहतूक लाखनी –केसलवाडा–अडयाळ–पवनी–भिवापूर–उमरेड– नागपूर मार्गाने वळविण्यात येईल.

तरी वरील सूचनाचे पालन करून पोलीस विभागास सहकार्य करावे.







# घरफोडी करणाऱ्या आरोपीतांना बोरी पोलीसांनी केली अटक

पोलीस ठाणे बोरी अंतर्गत फिर्यादी नामे विरांग प्रभाकरराव वैरागडे वय ४२ वर्ष, रा. जिजामाता शाळेमागे प्रभाग क्र.०१ बुट्टीबोरी तालुका जिल्हा नागपुर ग्रामिण यांनी तोंडी रिपोर्ट दिला की, गल्ल्यामध्ये ठेवलेला ५०० रू. चा एक बंडल असा एकुन नगदी ५०,००० रू. चोरून नेला. अशा उपरोक्त रिपोर्ट वरून कलम ३३४(१), ३०५(अ), ३(५) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल असुन, सदर गुन्हा उघडकीस आणन्याचे दृष्टीने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने उपविभागीय पोलीस अधिकारी प्रभारी श्रीमती पुजा गायकवाड नागपुर विभाग नागपुर यांच्या मार्गदर्शना खाली पोस्टे बोरी प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. प्रतापराव भोसले यांनी एक पथक तयार केले. पथकाने तात्काळ सदर गुन्हयाचे घटनास्थळी जावुन पाहणी केली आणि पुरावे हस्तगत केले. प्राप्त पुरावाच्या आधारे, तांत्रीक तपास करून तसेच गोपनीय खबरेच्या आधारे यातील फरार आरोपीचा शोध घेवुन आरोपी नामे यश उर्फ यशु मनोज निमजे, वय २२ वर्ष, रा. गोळीबार चौक पटवि गल्ली गवळी बाबा मंदिराचे समोर टिमकी नागपुर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता आरोपीने सदर गुन्हा केल्याची कबुली दिली तसेच त्याचे अंगझडती मध्ये गुन्हयातील नगदी २०,०००/– रू. मिळुन आले तसेच सदर गुन्हा त्याचे इतर साथीदार नामे १) कल्लु होले २) हितेश उर्फ गोलु पैगामी दोन्ही रा.नागपुर यांचे सह केल्याचे त्याने सांगितले . सदर गुन्हयात १) गुन्हयात वापरलेली मो.सा.एम.एच.४० बी.झेड ३९१० कि. ७५,०००/–रू.२) एक निळया रंगाचा ॲन्ड्राईड रेडमी कंपनीचा मो.कि. १०,०००रू. ३) एक आकाशी रंगाचा ॲन्ड्राईड विवो कंपनीचा मो.कि. १०,००० रू.४) एक स्टीलचे पाते असलेला धारदार चाकु कि. १०० रू.५) नगदी २०,००० /–रू. असा १,१५,१०० /–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे. एक आठवडयापुर्वी आरोपीचे साथीदार नामे कल्लु होले यांने बुट्टीबोरी परिसरातुन एक काळया रंगाची पल्सर मो.सा. क्र. एम. एच.–४०/बी.झेड ३९१० किंमती ७५,०००/–रू.चोरी केल्याचे उघड झाले आहे व सदर मो.सा. ही घरफोडी करण्याकरीता वापरली आहे. तसेच सदर आरोपी यांने नागपुर शहर हद्दीत पोस्टे गिटटीखदान, कळमना येथे चोरी केल्याची कबुली दिली आहे. यातील आरोपीस अटक करून गुन्हे प्रकरटीकरण पथकाने पो. ठाणेचे दोन गुन्हे उघडकीस आनले आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**